# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१७८/२०१५ मधील
# निशाणी क्र.९६ वर आदेश

**CNRNO.MHLA110007822018.**

---

१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.६ ने नि.क्र.६० वर उलटतपास नसल्याबाबत झालेला हुकूम बाजुस सारुन साक्षीदाराचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जाला वादीने म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. सदरचे प्रकरण सन–२०१५ पासून प्रलंबित आहे. सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र.६ ने नि.क्र.९० प्रमाणे कैफियत दाखल केल्याचे व त्याअनुषंगाने उलटतपास घेणे आवश्यक असल्याचे कथन केलेले आहे. सदर प्रकरणात दाखल कागदपत्रांवरुन स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र.६ ला नि.क्र.८८ वरील आदेशानुसार कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. सदरचा दावा मिळकतीची वाटणी होऊन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा दावा स्थावर मिळकतीबाबत असल्याचे स्पष्ट होते. सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास आणखी विलंब होणार आहे. सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास होणारा विलंब खर्चाच्या स्वरुपात भरुन काढुन प्रतिवादी क्र.६ ला बचाव मांडण्यासाठी संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.६ वर खर्च बसवुन मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.९६ वरील अर्ज प्रतिवादी क्र.६ वर रु.३००/– खर्च बसवुन मंजूर करण्यात येत आहे.

---

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.६ ने वादीला पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात द्यावे.

स्वा/-
(शि. म. गौरगोंड)
दि. ०२.०८.२०१९. सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.N. Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 02.08.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 02.08.2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 03.08.2019 |